# प्रेसनोट

दिनांक– २७/११/२०१८.

## अंबरनाथ नगरपरिषद येथील कनिष्ठ लिपीकाविरुध्द लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल.

दिनांक २७/११/२०१८ रोजी, अंबरनाथ नगरपरिषद येथील कनिष्ठ लिपीक(प्रभारी पदनिर्देशन अधिकारी) **अर्जुन हिम्मतराव पाटील,** वय ४९ वर्षे यांच्याविरुध्द तक्रारदार यांच्याकडे २०,०००/– रुपये लाचेची मागणी केल्यावरुन अंबरनाथ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांना त्यांच्या अंबरनाथ येथील घराचे अनधिकृत बांधकाम करु देण्यासाठी व त्यावर कारवाई न करण्यासाठी यातील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. त्यानुसार नमुद लोकसेवक यांनी लाचेचा पहिला हप्ता म्हणून ५,०००/– घेण्याचे कबुल केले. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/१०/२०१८ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून, लोकसेवक **अर्जुन हिम्मतराव पाटील** यांच्याविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती निलीमा कुलकर्णी, पोलीस उप अधीक्षक, अेसीबी, ठाणे हया करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८१०८८००५७९ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई–मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner